जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक २२२ | रविवार, ८ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त

### हरवलेले मोबाइल पोलिसांकडून १३० जणांना सुपूर्द

**पिंपरी, ता. ७ :** सांगवी पोलिसांनी हरवलेले १३० मोबाइल शोधून नागरिकांना परत दिले. हरवलेले मोबाइल मिळाल्याने मोबाइल धारकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. सांगवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र कोळी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अमोल नांदेकर आणि पोलीस अंमलदार राजकुमार माने यांनी या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली. नागरिकांचे हरवलेले मोबाइल शोधण्यासाठी सीईआयआर पोर्टलचा वापर करून तांत्रिक तपास करण्यात आला. त्यानंतर विविध ठिकाणांहून हे मोबाइल शोधून काढण्यात यश आले. सुमारे १३० मोबाइलचा शोध घेऊन ते मूळ मालकांना सुपूर्द करण्यात आले. हे मोबाइल मार्च रोजी सांगवी विभागाचे सहायक पोलीस आयुक्त सचिन हिरे यांच्या हस्ते मोबाइल मालकांना परत करण्यात आले. आपले हरवलेले मोबाइल पुन्हा मिळाल्याने नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले. मोबाइल मि ळाल्यानंतर नागरिकांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद हा प्रेरणादायी असल्याची भावना पोलिसांनी व्यक्त केली. सांगवी पोलिसांनी नागरिकांना मोबाइल हरवल्यास तात्काळ तक्रार नोंदवण्याचे आवाहन केले आहे.

# भैरोबा नाला ते यवतसह चार महामार्गांच्या कामाचे भूमिपूजन येत्या महिनाभरात


## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची माहिती; आमदार राहुल कुल यांच्या पाठपुराव्याला यश

**पुणे, ता. ७ :** हडपसर ते यवत सहा पदरी उन्नत महामार्ग प्रकल्पाचे भूमिपूजन येत्या महिनाभरात करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाणार आहे. याबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत हि माहिती दिली. त्याचबरोबर पुणे-शिरूर, तळेगाव-चाकण-शिक्रापूर आणि नाशिक फाटा-खेड या महत्त्वाच्या प्रकल्पांचे भूमिपूजन हि याच महिन्यात होणार असल्याची माहिती ही यावेळी मंत्री गडकरी यांनी दिली.

हडपसर-यवत मार्गावर सहा पदरी उन्नतमार्ग उभारला जाणार असून त्यासाठी सुमारे ७ हजार ५१५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पात खराडी-विठ्ठलवाडी दरम्यान ३१ किमी लांबीचा उड्डाणपूल तयार केला जाणार आहे. तसेच भविष्यात उपनगरांसह ग्रामीण भागात मेट्रोचा विस्तार होणार असल्याने महामार्गांवरील उड्डाणपुलांची रचना करताना मेट्रोच्या संभाव्य मार्गाचा विचार करूनच खांबांची रचना करावी, अशा सूचनाही गडकरी यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगर परिसरातील वाढती वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. पुणे जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रातील रस्ते प्रकल्पांचा आढावा घेतल्यानंतर गडकरी यांनी सांगितले की, या प्रकल्पांमुळे पुणे महानगर परिसरातील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल. विशेष म्हणजे खराडी ते विठ्ठलवाडी दरम्यान तब्बल ३१ किलोमीटर लांबीचा देशातील सर्वात मोठा उड्डाणपूल उभारण्याचे नियोजन आहे. स्थानिक वाहतूक खालच्या रस्त्याने तर लांब पल्ल्याची वाहतूक उड्डाणपुलावरून होणार असल्याने प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.

गडकरी म्हणाले की, पुणे-शिरूर



महामार्ग पुढे छत्रपती संभाजीनगरपर्यंत जोडण्याचा प्रस्ताव आहे. शिरूर ते संभाजीनगर हा सुमारे १९२ किमी लांबीचा सहा पदरी महामार्ग असणार असून त्यासाठी सुमारे १५ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पाचा सविस्तर अहवाल तयार झाला आहे.

नाशिक फाटा ते खेड दरम्यान सुमारे ३२ किमी लांबीचा सहा पदरी महामार्ग उभारण्याचा प्रस्ताव असून त्यासाठी सुमारे ५ हजार २६५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. भविष्यात नाशिक फाटा ते चाकणदरम्यान मेट्रो मार्ग सुरू करण्याचाही विचार सुरू असल्याची माहिती देण्यात आली. मुंबई-पुणे प्रवास अधिक वेगवान करण्यासाठी पागोटे ते चौकदरम्यान ३२ किमी लांबीचा ग्रीनफील्ड सहा पदरी मार्ग उभारण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ६ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून यामुळे मुंबई ते पुणे प्रवास अवघ्या दीड तासांत पूर्ण होण्याची शक्यता आहे. दरम्यान, मुंबई -पुणे एक्स्प्रेसवरील लोणावळा परिसरातील मिसिंग लिंक प्रकल्पाचे काम मे २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले असल्याचेही गडकरी यांनी सांगितले. या चार महामार्ग प्रकल्पांमुळे पुणे महानगर परिसरातील वाहतुकीला नवी दिशा मिळणार असून औद्योगिक आणि आर्थिक विकासालाही मोठी चालना मिळेल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

> गेल्या वर्षभरापासून मी या सहा पदरी उड्डाणपुलासाठी राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. आजच्या अर्थसंकल्पात ५ हजार २६२ कोटी रुपयांची तरतूद झाल्याने पुण्याच्या ग्रामीण भागाच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळणार आहे. दौंडच्या जनतेच्या वतीने मी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो.
> - **राहुल कुल,** आमदार, दौंड विधानसभा

### आमदार राहुल कुल यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

पुणे-सोलापूर महामार्गावरील हडपसर ते यवत दरम्यान होणारी वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आणि दौंड तालुक्याच्या विकासाला गती देण्यासाठी आमदार राहुल कुल यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे यवत, केडगाव, भांडगाव, खोर, वरवंड आणि पाटस या भागांमध्ये गुंतवणूकदारांचा ओढा वाढणार आहे. महामार्गालगत वेअरहाउसिंग आणि लॉजिस्टिक क्षेत्राचा मोठा विकास होईल, कनेक्टिव्हिटी सुधारल्यामुळे गृहनिर्माण प्रकल्पांसाठी विकासकांचे लक्ष या भागाकडे वेधले जाईल.

दौंड तालुक्याच्या पश्चिम भागातील खोर, भांडगाव, वासुंदे, जिरेगाव या जिरायती पट्ट्याला आगामी पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाचा मोठा फायदा होणार आहे. महामार्ग, उड्डाणपूल आणि नियोजित विमानतळ या तिन्ही गोष्टींमुळे या परिसराचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलणार असून, हा प्रकल्प दौंडसाठी 'टर्निंग पॉईंट' ठरणार आहे.

# उन्नती कन्या विद्यालयात बालवाटिका-३ चा पदवीदान सोहळा उत्साहात

## विद्यार्थिनींच्या सांस्कृतिक सादरीकरणाने पालक मंत्रमुग्ध

**उरुळी कांचन, ता. ७ :** उरुळी कांचन येथील फक्त मुलींची शाळा म्हणून प्रसिद्ध असलेल्या उन्नती कन्या विद्यालयात बालवाटिका-३ चा पदवीदान सोहळा नुकताच उत्साहात व जल्लोषात पार पडला. विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरलेल्या या कार्यक्रमाला पालकांची मोठी उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाची संकल्पना शाळेच्या मुख्याध्यापिका पद्मादेवी विडप यांच्या संकल्पनेतून संचालिका नयॉन सुरेश कांचन व अध्यक्षा डॉ. नुपूर सुरेश कांचन यांच्या मार्गदर्शनाखाली साकारण्यात आली.

कार्यक्रमात बालवाटिका-३ मधील विद्यार्थिनींनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आकर्षक सादरीकरण करून उपस्थित पालकांची मने जिंकली. बालवाटिका-१पासूनचा



विद्यार्थिनींचा शैक्षणिक प्रवास PPT सादरीकरणाद्वारे उलगडण्यात आला, ज्यामुळे त्यांच्या बालपणीच्या गोड आठवणींना उजाळा मिळाला.

या प्रसंगी अध्यक्षा डॉ. नुपूर सुरेश कांचन व मुख्याध्यापिका पदमादेवी विडप यांनी विद्यार्थिनींना शुभेच्छा देत पुढील शैक्षणिक प्रवासासाठी प्रेरणादायी संदेश दिला. पदवीदान सोहळा मुलींमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि शिस्तीची जाणीव अधिक दृढ करतो, असे त्यांनी सांगितले.

यानंतर पालकांनी दीपप्रज्वलन करून आपल्या मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच या शैक्षणिक वर्षात विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थिनींना प्रमाणपत्रे व बक्षिसांचे वितरण करण्यात आले. ही पारितोषिके अध्यक्षा डॉ. नुपूर सुरेश कांचन, मुख्याध्यापिका पदमादेवी विडप आणि व्यवस्थापक आफरीन सय्यद यांच्या हस्ते देण्यात आली.

यावेळी १८ फेब्रुवारी रोजी झालेल्या कराटे परीक्षेतील यशस्वी विद्यार्थिनींनाही प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावरील आनंदी हास्य आणि पालकांच्या डोळ्यांतील अभिमानाने हा सोहळा अधिक अविस्मरणीय ठरला. या कार्यक्रमासाठी शाळेच्या सर्व शिक्षक व कर्मचारीवर्गाने सहकार्य केले.

# पुणे-सोलापूर महामार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत २८ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू

**यवत, ता. ७ :** पुणे-सोलापूर महामार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत २८ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. भांडगाव (ता. दौंड) हद्दीतील सोनाक्षी मंगल कार्यालयजवळ गुरुवारी (ता. ०५) रात्री दहा वाजता घडली. या प्रकरणी यवत पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विपीनकुमार श्रीजयकुमार चैरासिया (वय-२८, रा. रा. हरपळेवस्ती, भांडगाव ता. दौंड, मुळ गाव वार्ड क्र. २, तालबन्ना, दुर्गा मंदीरचे जवळ, पोस्ट साहेबगंज, जि. साहेबगंज राज्य झारखंड) असे अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी त्यांचे बंधु दीपककुमार श्रीजयकुमार चैरासिया यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या




माहितीनुसार, फिर्यादी दीपककुमार चैरासिया यांचा भाऊ विपीनकुमार चैरासिया हा सुमारे दहा दिवसांपूर्वी झारखंड येथून कामानिमित्त भांडगाव येथे आला होता. तो येथील टेस्टीबाईट कंपनीत काम करत होता व सोनाक्षी मंगल कार्यालयाजवळ भाड्याच्या खोलीत राहत होता.

गुरुवारी (ता. ०५) रात्री साडे दहा वाजता वाजण्याच्या सुमारास जेवण करून विपीनकुमार खोलीवर झोपण्यासाठी घरातून बाहेर पडला. काही वेळानंतर पुणे-सोलापूर महामार्गावर हरपळेवस्ती येथील बर्फ फॅक्टरीसमोर लोकांची गर्दी दिसल्याने दीपककुमार यांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता अज्ञात वाहनाने एका तरुणाला जोरदार धडक दिल्याचे दिसून आले. सदर घटनेची माहिती मिळताच श्री दत्त म्बुलन्स चालक समीर अन्सारी घटनास्थळी दाखल झाले. यावेळी पुढील उपचारासाठी घेऊन जाताना रुग्णवाहिकेत पाहिले असता जखमी अवस्थेत असलेला तरुण हा त्यांचा भाऊ विपीनकुमार असल्याचे दिसून आले. त्याच्या डोक्याला, हाताला व पायाला गंभीर दुखापत झाली होती. त्यानंतर त्याला तातडीने यवत येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणी करून तो उपचारापूर्वीच मृत झाल्याचे घोषित केले. या प्रकरणी यवत पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणी पुणे-सोलापूर महामार्गावर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडवून तरुणाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास यवत पोलीस करीत आहेत

# उरुळी कांचनमध्ये दारूच्या नशेत वाहन चालवल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

**उरुळी कांचन, ता. ७ :** दारूच्या नशेत वेडीवाकडी वाहन चालवत नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या दोघांवर उरुळी कांचन पोलिसांनी कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई उरुळी कांचन पोलिसांकडून शिंदवणे रोड परिसरात वाहतूक नियमन करत असताना करण्यात आली.



रोहित गिरी (वय २८, कन्या शाळेमागे, लोणी काळभोर, ता. हवेली) व बळिराम बाळासाहेब वाघमारे (वय-३५, सध्या रा. इंद्रप्रस्थ सोसायटी, शेवाळवाडी, ता. हवेली; मूळ रा. आपेगाव, जि. बीड) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यातील पोलीस कॉन्स्टेबल अश्विजीत मोहोडव व हवालदार धनंजय भोसले यांनी फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (ता. ०३) सात वाजण्याच्या सुमारास शिंदवणे रोड, उरुळी कांचन येथे वाहतूक शाखेचे पोलीस वाहतूक नियमन करत असताना औदुंबर लॉन्ससमोर एक संशयित वाहनचालक वेडीवाकडी कार चालवत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

पोलिसांनी तत्काळ कार थांबवून चौकशी केली. यावेळी त्याचे नाव गिरी असे सांगितले. तोंडातून उग्र दारूचा वास येत असल्याने त्याला ताब्यात घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्र, उरुळी कांचन येथे वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तपासणीत तो दारूच्या नशेत वाहन चालवत असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, याच कारवाई दरम्यान पोलिसांनी आणखी एका वाहनचालकाला अडवले. बळिराम वाघमारे हा व्यक्ती एमएच १२ एक्सडब्ल्यू ०५६० क्रमांकाची दुचाकी वेडीवाकडी चालवत असल्याचे आढळले. चौकशीदरम्यान त्यानेही दारू पिल्याची कबुली दिली. त्याचीही प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय तपासणी करण्यात आली असता तो मद्यधुंद अवस्थेत असल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले. या प्रकरणी दोन्ही वाहनचालकांविरुद्ध उरुळी कांचन पोलीस ठाण्यात मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# लोणी-काळभोर व कदमवाकवस्तीतील कचरा वादावर तोडगा निघणार?

## प्रांत कार्यालयात उद्या उच्चस्तरीय बैठक

**लोणी काळभोर, ता. ७ :** लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती ग्राम पंचायतींकडून मुळा-मुठा नदीपात्रात टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे निर्माण झालेला वाद चांगलाच चिघळला असून या गंभीर प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सोमवारी (ता. ०९) दुपारी चार वाजता हवेलीचे उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने यांच्या दालनात उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. महेश चोपडे यांनी या प्रश्नावर तातडीने सर्व संबंधितांची बैठक बोलावण्याची मागणी उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने यांच्याकडे केली होती. त्यानुसार प्रशासनाने सर्व विभागांना पाचारण करत ही महत्त्वाची बैठक आयोजित केली आहे.



या बैठकीस पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख, पुणे जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी, हवेली पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता, लोणी काळभोर व कदमवाकवस्ती ग्रामपंचायतींचे सरपंच व ग्रामविकास अधिकारी, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कुलसचिव तसेच लोणी काळभोरचे अपर तहसीलदार उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत या कचऱ्या संदर्भात यापुढे काय भूमिका घ्यायची? कचरा व्यवस्थापन प्रकल्प कुठे व कसा तयार करायचा या बद्दल निर्णय होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून मुळा-मुठा नदीपात्रात टाकण्यात येणारा कचरा हा परिसरातील स्फोटक प्रश्न बनला आहे. २७ फेब्रुवारीला सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास नदीपात्रातील कचऱ्याला अचानक आग लागली होती. सुरुवातीला किरकोळ वाटणारी ही आग तब्बल चार दिवस धुमसत राहिली. या आगीतून निघणाऱ्या काळ्या धुरामुळे संपूर्ण परिसरात विषारी वातावरण निर्माण झाले होते.

या धुराचा सर्वाधिक फटका एमआयटी शैक्षणिकसंकुलातीलविद्यार्थीतसेचआसपासच्या नागरिकांना बसला. संतप्त विद्यार्थ्यांनी आंदोलन छेडल्यानंतर लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती ग्रामपंचायतींच्या कचरा वाहतूक करणाऱ्या गाड्यांना विद्यापीठ परिसरातून नदीकडे जाण्यास बंदी घालण्यात आली.

मात्र या निर्णयामुळे नव्यानेच संकट उभे राहिले आहे. कचऱ्याचा मार्ग बंद झाल्याने दोन्ही गावांमध्ये रस्त्यांवर व मोकळ्या जागांवर कचऱ्याचे ढीग साचू लागले असून दुर्गंधीमुळे नागरिकांचे जगणे अक्षरशः असह्य झाले आहे. डास-माशांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने रोगराई पसरू शकते, अशी भीतीही व्यक्त होत आहे. दरम्यान, या गंभीर प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी पुणे शहर पोलीस दलाचे परिमंडळ ६ चे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले यांनी पुढाकार घेतला असून त्यांच्या समन्वयातून ही बैठक होत आहे. या बैठकीत कचरा व्यवस्थापनासाठी पर्यायी जागा निश्चित करणे, तात्पुरत्या उपाययोजना आणि कायमस्वरूपी प्रकल्प उभारणीबाबत निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या बैठकीतून नेमका काय तोडगा निघतो, याकडे नागरिक आणि विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

# पुरुषप्रधान क्षेत्रात महिला शक्तीची झेप; गीतांजली कंठाळे यांची प्रेरणादायी वाटचाल

**आजच्या बदलत्या काळात महिलांनी आपल्या कर्तृत्वाने अनेक क्षेत्रांत नवी उंची गाठली आहे. ज्या क्षेत्रांमध्ये कधी पुरुषांचे वर्चस्व मानले जात होते, अशा कठीण आणि जबाबदारीच्या कामांतही महिलांनी धैर्य, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर स्वतःची ठळक ओळख निर्माण केली आहे. अशाच जिद्दी आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे तक्रारवाडी येथे विद्युत तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असलेल्या गीतांजली कालिदास कंठाळे.**

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार येथील रहिवासी असलेल्या गीतांजली कंठाळे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षणाचा प्रवास पूर्ण केला. जीवनाच्या वाटेवर अनेक अडचणी आणि मर्यादा आडव्या येत असतानाही त्यांनी हार न मानता चिकाटीने शिक्षण घेतले. बी.ए. पदवीसह इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा पूर्ण करत त्यांनी आपल्या स्वप्नांना आकार दिला.

एकत्रित कुटुंब पद्धतीत वाढलेल्या गीतांजली कंठाळे यांना घरातील सर्व सदस्यांनी शिक्षणासाठी सातत्याने प्रोत्साहन दिले. कुटुंबाचा विश्वास आणि पाठबळ यामुळेच त्यांनी शिक्षणाची वाट खंबीरपणे पूर्ण केली. विशेष म्हणजे, आपल्या एकत्रित कुटुंबातून सरकारी नोकरी मिळवणाऱ्या त्या पहिल्याच सदस्य ठरल्या. एवढेच नव्हे तर आपल्या गावातून पहिल्या महिला विद्युत तंत्रज्ञ बनण्याचा मानही त्यांनी मिळवला, तसेच जिल्ह्यातील पहिल्या महिला विद्युत तंत्रज्ञांपैकी एक म्हणून त्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले.

लहानपणापासूनच विद्युत क्षेत्राबद्दल असलेली ओढ आणि जिज्ञासा लक्षात घेऊन त्यांनी याच क्षेत्रात करिअर घडवण्याचा निश्चय केला. अथक परिश्रमांच्या जोरावर त्यांनी महावितरणच्या भिगवण कार्यालयात टेक्निशियन म्हणून काम सुरू केले. आज त्या तक्रारवाडी परिसरात विद्युत

**महिला दिन विशेष...**



तंत्रज्ञ म्हणून जबाबदारीने कार्य करत असून नागरिकांना अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी दिवस-रात्र तत्पर असतात.

या प्रवासात त्यांच्या सर्व पुरुष वायरमन सहकाऱ्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले असून त्यामुळे त्यांचे काम अधिक सक्षमपणे पार पडत आहे.

वीजपुरवठ्याचे काम हे अत्यंत धोकादायक आणि जबाबदारीचे मानले जाते. कधी अंधारी रात्र, कधी मुसळधार पाऊस, तर कधी वादळी वारे-अशा प्रतिकूल परिस्थितीतही लोकांच्या घरात प्रकाश पोहोचवण्यासाठी त्या निडरपणे कर्तव्य बजावत असतात. संकटाच्या प्रत्येक क्षणी शांत मनाने आणि धैर्याने परिस्थितीला सामोरे जात त्या आपले कर्तव्य पार पाडतात.

संघर्षाची गाथा घडविणाऱ्या
त्या जिद्दीच्या वाटा,
काट्याकुट्यातून चालतही त्यांनी
उजळविल्या स्वप्नांच्या ज्योती,
वादळ-वाऱ्यांशी सामना करत
कर्तव्याचा घेतला ध्यास,
महिला शक्तीचा तेजस्वी दीप बनला
गीतांजलींचा प्रवास.

पुरुषप्रधान समजल्या जाणाऱ्या या क्षेत्रात त्यांनी आपल्या मेहनतीने आणि जिद्दीने महिला विद्युत तंत्रज्ञ म्हणून वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांची चिकाटी, कर्तव्यनिष्ठा आणि आत्मविश्वास अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

महिला दिनाच्या निमित्ताने गीतांजली कंठाळे यांची ही वाटचाल केवळ यशाची कहाणी नसून संघर्ष, जिद्द आणि स्वप्नपूर्तीचा प्रेरणादायी संदेश देणारी आहे.

शब्दांकन :
**सागर जगदाळे,** भिगवण

## संक्षिप्त

### शेतकऱ्यांसाठी केलेली कर्जमाफी तकलादू ; राजू शेट्टींची टीका

**सातारा, ता. ७ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. या अंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतचे २ लाख रुपयांपर्यंतचे थकीत पीक कर्ज माफ केले जाणार आहे. तसेच, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान मिळणार आहे. या घोषणेनंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी ही कर्जमाफी तकलादू असल्याचे म्हटले आहे. राज्य सरकारने पुन्हा एकदा शेतकऱ्यांचा विश्वासघात केला आहे. ऑक्टोबर महिन्यात आंदोलनानंतर झालेल्या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण कर्जमाफी केली जाईल, असे आश्वासन दिले होते. बहुतांश शेतकऱ्यांची पीक कर्जे ही साडेतीन ते चार लाख इतकी आहेत. दोन लाखांच्या वरची रक्कम भरल्याशिवाय त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. दोन लाखांवरील रक्कम शेतकरी कुठून भरणार? ही योजना शेतकऱ्यांसाठी की बँकांसाठी? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

### जुनी वाहने मोडीत काढल्यास नवीन खरेदीवर करसवलत

**मुंबई, ता. ७ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या अर्थसंकल्पातून वाहनचालकांसाठी महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकारने स्क्रॅपिंग धोरणाला चालना दिली असून, जुन्या वाहनांवरील पर्यावरण कर (ग्रीन टॅक्स) थेट दुप्पट केला आहे. यानुसार, जुन्या दुचाकींवरील कर २ हजार रुपयांवरून ४ हजार रुपये, तर पेट्रोल कारसाठी ६ हजार आणि डिझेल कारसाठी ७ हजार रुपये कर मोजावा लागणार आहे.मात्र, जुनी वाहने मोडीत काढून नवीन वाहन घेणाऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. बीएस-३ मानकांची वाहने मोडीत काढल्यास नवीन खरेदीवर वाहन करात ३० टाकेसूट, तर बीएस-४ वाहनांसाठी १६ टक्के सूट जाहीर करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, दस्त नोंदणी करताना मुद्रांक शुल्क वाचवण्यासाठी कमी मुद्रांकावर दस्त नोंदणी होते. महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसात होते. त्यामुळे कमी मुद्रांकावर दस्त नोंदणी केल्यास आता ५ हजार रुपयांऐवजी १ लाख रुपयांपर्यंत दंड भरावा लागणार आहे. यामुळे कमी मुद्रांक शुल्क भरून दस्त नोंदणी करण्याचे प्रमाण नियंत्रणात येऊन महसूलात वाढ होऊ शकतो.

### क्रेनच्या चाकाखाली सापडून ज्येष्ठाचा मृत्यू

**मुंढवा, ता. ७ :** क्रेनच्या चाकाखाली सापडून ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना मुंढव्यातील केशवनगर भागात घडली. या प्रकरणी क्रेन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. साहेबराव विठोबा दंडारे (वय ७२) असे मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठाचे नाव आहे. याबाबत त्यांचा मुलगा रवींद्र (वय ४२, रा. बारगावत, वरुड, जि. अमरावती) यांनी मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साहेबहराव हे मुंढवा-केशवनगर परिसरातील झेड कॉर्नरजवळ रस्त्याच्या कडेला झोपले होते. फेब्रुवारी रोजी सायंकाळी क्रेन च्या चाकाखाली सापडून त्यांचा मृत्यू झाला. अपघातास जबाबदार ठरल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहायक पोलीस निरीक्षक माळी तपास करत आहेत.

### सरकारचा ४८ लाख नोंदींचा दावा खोटा : मनोज जरांगे-पाटील

**जालना, ता. ७ :** मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सरकार उदासीन आहे. कुणबी नोंदीवरूनही घोळ घातला जात असून ४८ लाख नोंदी सापडल्याचा सरकारचा दावा खोटा असल्याचा हल्ला मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला. मराठा आरक्षण उपसमितीला दिलेल्या अहवालात ५८ लाख नोंदींचा उल्लेख आहे. अधिकारी वर्ग नोंदींच्या बाबतीत सरकारला चुकीची माहिती देत असल्याचा आरोपही जरांगे यांनी केला. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर काल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शिंदे समितीला दिलेल्या मुदतवाढीनंतर नवीन ४८ लाख कुणबी नोंदी सापडल्याचा दावा केला होता. त्यावरून प्रमाणपत्र वाटपही करण्यात आल्याचे विखे यांनी सांगितले होते. मात्र हा दावा मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना खोडून काढला.

### बेकायदेशीर हुक्का विक्री; तिघांवर गुन्हा

पिंपरी, ता. ७ : ग्राहकांना जेवणासोबत हुक्का पिण्यासाठी देत तंबाखूजन्य पदार्थांचा वापर करण्यात आला. या प्रकरणी भुकूम येथील एका हॉटेलवर कारवाई करण्यात आली. याबाबत पोलीस शिपाई संदीप भरत रोकडे (वय -३९) यांनी शुक्रवारी बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी भुकूम येथील एका हॉटेलमध्ये वेगळा हुक्का झोन न ठेवता ग्राहकांना एकत्र बसवून हुक्का पिण्यास दिला. यावेळी पोलिसांनी कारवाई करत हुक्का पॉट, फ्लेवर व अन्य साहित्य असा सहा हजार ४७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. बावधन पोलीस तपास करत आहेत.

# आदर्श फार्मसीच्या माजी विद्यार्थ्यांचे योगदान उल्लेखनीय : डॉ. एन. एस. महाजन

**कराड, ता. ६ :** आदर्श फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून औषधनिर्माण क्षेत्रात देश-विदेशातील विविध नामांकित औषध उद्योग, रुग्णालये तसेच संशोधन संस्थांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत. आपल्या कर्तृत्वाच्या बळावर त्यांनी संस्थेचे नाव उंचावले असल्याचे मत प्राचार्य डॉ. एन. एस. महाजन यांनी व्यक्त केले.



या सर्व माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत आदर्श फार्मसी स्टुडंट अलुमनी असोसिएशनची स्थापना केली असून या माध्यमातून दरवर्षी गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, शिष्यवृत्ती तसेच शैक्षणिक व करिअर मार्गदर्शन दिले जाते. या उपक्रमामुळे माजी आणि सध्याच्या विद्यार्थ्यांमध्ये सुसंवाद वाढून संस्थेची परंपरा अधिक बळकट होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

औषधनिर्माण क्षेत्रात सातत्याने होत असलेले तांत्रिक बदल, संशोधनातील प्रगती आणि जागतिक स्पर्धा लक्षात घेता विद्यार्थ्यांनी अद्ययावत ज्ञान आत्मसात करून स्वतःला सक्षम बनवणे आवश्यक आहे, असेही डॉ. महाजन यांनी नमूद केले. महाविद्यालयातील अनेक माजी विद्यार्थी आज प्रतिष्ठित औषधनिर्माण कंपन्या, क्लिनिकल रिसर्च संस्था व रुग्णालयांमध्ये महत्त्वाच्या पदांवर कार्यरत असून त्यांचा अनुभव सध्याच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात या उपक्रमाचा विस्तार करून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत मदत पोहोचवण्याचा संकल्पही आयोजकांनी व्यक्त केला.

यावेळी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी महाविद्यालयातील अंतिम वर्ष बी. फार्मसीच्या विद्यार्थिनी अक्षता माळी हिची शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आली. तिच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक प्रगतीचा, अभ्यासू वृत्तीचा व मेहनतीचा मान्यवरांच्या हस्ते शिष्यवृत्ती प्रमाणपत्र व आर्थिक सहाय्य देऊन गौरव करण्यात आला.

दरम्यान, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुजा जाधव व प्राची गोटपागर यांनी केले. या कार्यक्रमास डॉ. विजय पाटील, कॅम्पस डायरेक्टर पूजा पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. प्रकाश मोकाशी, प्रा. सविता माळी तसेच प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री बचावले

**उत्तर प्रदेश, ता. ७ :** उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य आज एका मोठ्या अपघातातून थोडक्यात बचावले आहेत. लखनौहून कौशांबीच्या दिशेने उड्डाण केल्यानंतर काही वेळातच त्यांच्या हेलिकॉप्टरमध्ये बिघाड झाला. परिस्थिती इतकी गंभीर होती की, हेलिकॉप्टरच्या डिस्प्ले पॅनेलने काम करणे बंद केले आणि संपूर्ण केबिनमध्ये धुराचे लोट पसरले. यामुळे वैमानिकाने तातडीने निर्णय घेत हेलिकॉप्टर पुन्हा लखनऊ विमानतळावर सुरक्षितपणे उतरवले.

केशव प्रसाद मौर्य आज, ७ मार्च रोजी कौशांबी येथील सारस महोत्सवाच्या उद्घाटनासाठी निघाले होते. मात्र, उड्डाण केल्यानंतर काही मिनिटांतच हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड जाणवू लागला. केबिनमध्ये धूर भरल्याने एकच खळबळ उडाली. वैमानिकाने प्रसंगावधान राखत तातडीने एअर ट्रॉफिक कंट्रोलशी संपर्क साधला आणि आपत्कालीन लँडिंग केले. सुदैवाने, मौर्य यांच्यासह विमानातील सर्व प्रवासी सुरक्षित असून कोणालाही इजा झालेली नाही.

या घटनेतून केशव मौर्य थोडक्यात बचावले. पण या घटनेने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची पुन्हा आठवण झाली. राजकीय नेत्यांच्या प्रवासादरम्यान वारंवार घडणाऱ्या अशा तांत्रिक बिघाडांमुळे आता व्हीव्हीआयपी सुरक्षेचा आणि विमानांच्या देखभालीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

या घटनेनंतर प्रशासकीय आणि सुरक्षा यंत्रणांनी तातडीने तपास सुरू केला आहे. तांत्रिक पथक हेलिकॉप्टर मधील बिघाडाचे नेमके कारण शोधत आहे. दरम्यान, केशव प्रसाद मौर्य यांनी आपला कौशांबीचा दौरा रद्द न करता, रस्तेमार्गे जाण्याचा निर्णय घेतला आहे. ते सायरा येथील बाबू सिंह पदवी महाविद्यालयाच्या मैदानात आयोजित महिला सक्षमीकरणावर आधारित सारस महोत्सवाचे उद्घाटन करणार आहेत.

# पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेतेपदी श्रीमंत ढोले

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या बंद पाकिटातून नाव जाहीर

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. ०७ : पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेतेपदी इंदापूर तालुक्यातील काटी-लाखेवाडी जिल्हा परिषद गटातून निवडून आलेले सदस्य श्रीमंत ढोले यांची शुक्रवारी (ता. ०६) निवड करण्यात आली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गटनेत्याचे नाव बंद पाकिटातून पाठवले होते.

मावळचे आमदार सुनील शेळके यांनी नवनिर्वाचित सदस्यांच्या बैठकीत हे पाकिट उघडत ढोले यांच्या नावाची घोषणा केली. या निवडीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व जिल्हा परिषद सदस्यांनी एकमताने पाठिंबा दर्शविला. पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित सदस्यांची



बैठक शुक्रवारी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष व जिल्हा परिषद निवडणुकीचे जिल्हा समन्वयक सुरेश घुले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

यावेळी आमदार सुनील शेळके, दौंडचे माजी आमदार रमेश थोरात, शिरूरचे माजी आमदार अशोक पवार, पुरंदरचे माजी आमदार संभाजी कुंजीर, जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजय कोलते, देवराम लांडे, पक्षाचे जिल्हाध्यक्ष संभाजी होळकर, राजेंद्र कोरेकर, विठ्ठल शिंदे तसेच जिल्हा परिषदेतील माजी गटनेते शरद बुट्टे पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

गटनेता निवडीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सदस्यांची ओळख करून देण्यात आली तसेच गट स्थापनेसाठी आवश्यक कागदपत्रांवर सर्व सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. दरम्यान, गटनेतेपदी निवड झाल्यानंतर श्रीमंत ढोले यांनी पक्ष नेतृत्वाचे व सर्व सदस्यांचे आभार मानत, जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका अधिक प्रभावीपणे मांडत विकासकामांना गती देण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करू, अशी भावना व्यक्त केली.

# इंदापुरात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिसांची कारवाई

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. ०७ : इंदापुर पोलिसांनी शहरात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेशिस्तपणे वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई केली आहे. जवळपास २८ वाहन चालकांवर केलेल्या कारवाईतून इंदापूर पोलिसांनी ३८ हजार ५०० रुपयांचा दंड आकारला आहे. इंदापूर पोलिस प्रशासनाने कारवाईची मोहीम राबविल्याने बेशिस्त वाहन चालकाचे धाबे चांगलेच दणाणल्याच पाहायला मिळालं.



गुरुवारी (ता. ५) सायंकाळी साडेसहा ते साडेआठ या वेळेत इंदापुरातून जाणाऱ्या जुन्या पुणे सोलापूर महामार्गावर ही कारवाई केली. यामध्ये जसे की विना नंबर प्लेट दुचाकीवरून प्रवास करणे, ट्रिपल सीट प्रवास करणे, कर्कश आवाजाचा सायलेन्सर वापरून ध्वनी प्रदूषण करणे,हेल्मेटचा वापर न करणे,विना वाहन चालक परवाना प्रवास करणे यास अनेक मुद्द्यांवरून पोलिसांनी वाहन चालकांनावर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. गेल्या काही दिवसांपासून इंदापुरात काही दुचाकीचालक वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेफिकीरपणे वाहने चालवत आहेत.यामुळे इतर दुचाकी स्वारांसह शाळकरी विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागतोय.

ही बाब लक्षात घेता इंदापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विलास नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक हनुमंत वाघमारे, पोलीस कॉन्स्टेबल अनिल नागरगोजे, सुहास आरणे, अमोल खाडे, पद्मसिंह शिंदे, महिला पोलीस कॉन्स्टेबल शोभा खरात यांनी केली आहे. तर सर्वसामान्य नागरिकांनी मात्र या कारवाईचे कौतुक कले आहे.

# आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील भारत- न्यूझीलंड फायनल आज रंगणार

**मुंबई, ता. ७ :** आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील फायनलचा सामना भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये खेळवला जाणार आहे. दोन्ही संघांनी या स्पर्धेत दमदार कामगिरी करून फायनलचं तिकीट मिळवलं आहे. दोन्ही संघांनी या स्पर्धेत प्रत्येकी १-१ सामना गमावला आहे.




सुपर ८ फेरीत भारतीय संघाला दक्षिण आफ्रिकेकडून पराभवाचा सामना करावा लागला होता. तर साखळी फेरीतील सामन्यात दक्षिण आफ्रिकेने न्यूझीलंडचा पराभव केला होता. पहिल्या सेमी फायनलमध्ये न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून फायनलमध्ये प्रवेश केला आहे. तर भारतीय संघाने इंग्लंडला पराभूत करून फायनलमध्ये प्रवेश केला आहे.

भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांनी फायनलमध्ये प्रवेश केला आहे. आता दोन्ही संघांकडे इतिहास घडवण्याची संधी असणार आहे. न्यूझीलंडला आतापर्यंत जेतेपदाची एकही ट्रॉफी उंचावता आलेली नाही. त्यामुळे न्यूझीलंडचा संघ पहिली ट्रॉफी जिंकण्याच्या प्रयत्नात असणार आहे. तर दुसरीकडे भारतीय संघाने चौथ्यांदा या स्पर्धेतील फायनलमध्ये प्रवेश केला आहे.

यादरम्यान २ वेळा जेतेपदाची ट्रॉफी उंचावण्याची संधी असणार आहे. आजवर कुठल्याही संघाला ३ वेळा जेतेपदाची ट्रॉफी उंचावता आलेली नाही. त्यामुळे हा देखील मोठा रेकॉर्ड असणार आहे. तसेच मायदेशात खेळताना कुठलाही संघ जेतेपदाची ट्रॉफी उंचावू शकलेला नाही. त्यामुळे भारतीय संघाला हा रेकॉर्ड देखील आपल्या नावावर करण्याची संधी असणार आहे.

दरम्यान, भारत आणि न्यूझीलंड यांच्यात होणारा फायनलचा सामना आज रविवारी खेळवला जाणार आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात होणारा फायनलचा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियम वर भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता सुरू होणार आहे. तर नाणेफेक संध्याकाळी साडे सहा वाजता होणार आहे. त्याआधी संध्याकाळी साडेपाच वाजता पॉप स्टार रिकी मार्टीनचा शो असणार आहे.

# शिरूर पंचायत समितीत सोमवारी सभापती-उपसभापतीची निवड; राजकीय घडामोडींना वेग

**पोपट पाचंगे**

रांजणगाव गणपती, ता. ७ : शिरूर पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदाची निवडणूक सोमवारी (ता. ०९) होणार असून या महत्त्वाच्या पदांवर कोणाची वर्णी लागणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. निवडणुकीपूर्वी राजकीय हालचालींना वेग आला असून इच्छुक उमेदवारांकडून जोरदार लॉबिंग सुरू असल्याचे दिसून येत आहे.

महिनाभरापूर्वी झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत १४ जागांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसने ८, भारतीय जनता पक्षाने ५ तर एका अपक्षाने विजय मिळवला होता. सणसवाडी गणातून निवडून आलेल्या अपक्ष सदस्य कोमल




ढेरंगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला पाठिंबा दिल्याने राष्ट्रवादीचे संख्याबळ ९ वर पोहोचले आहे. त्यामुळे सभापती व उपसभापतीपदावर राष्ट्रवादी काँग्रेसचीच पकड राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, सभापती पद नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलेसाठी राखीव असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन महिला उमेदवारांमध्ये चुरस निर्माण झाली आहे. बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश पवार यांच्या पत्नी वंदना पवार तसेच शिरूर ग्रामीणचे माजी सरपंच विठ्ठल घावटे यांच्या पत्नी स्वाती घावटे या सभापतीपदासाठी प्रबळ दावेदार मानल्या जात आहेत. तर उपसभापती पदासाठी रामराव सासवडे, दीपक पवार, विजय रणसिंग आणि विकास शेलार हे प्रमुख इच्छुक असल्याचे समजते.

सभापती व उपसभापती पदासाठी इच्छुक उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके, माजी आमदार ड. अशोक पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोरेकर हे जो निर्णय घेतील तो मान्य राहील, अशी भूमिका व्यक्त केली आहे. त्यामुळे या चार नेत्यांच्या चर्चेनंतरच अंतिम नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, भारतीय जनता पक्षाच्या गटनेतेपदी कारेगाव गणातून निवडून आलेल्या मनिषा सतीश पाचंगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेतेपदी न्हावरे गणातील सदस्य दीपक गीताराम पवार यांची निवड झाली आहे.

**निवडणूक कार्यक्रम**

सोमवारी सकाळी १०.३० ते ११ : सभापती व उपसभापती पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल दुपारी साडेबारा वाजता विशेष सभेचे कामकाज सुरू होणार, सभापती आणि उपसभापती पदाच्या या निवडीमुळे शिरूर तालुक्यातील स्थानिक राजकारणाचे पुढील समीकरण ठरणार असल्याने संपूर्ण तालुक्याचे लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे.

**चर्चेत असलेले काही महत्त्वाचे मुद्दे**

- पक्षनिष्ठा आणि सातत्याने काम करणाऱ्या सदस्याला प्राधान्य मिळणार का?
- पूर्व-पश्चिम भागाचा भौगोलिक समतोल साधला जाणार का?
- जनसंपर्क आणि शैक्षणिक गुणवत्ता निर्णायक ठरणार का?
- अनुभवी सदस्य की नव्या चेहऱ्याला संधी?

# जमिनीच्या वादातून कुटुंबीयांना घरात घुसून मारहाण

**दौंड, ता. ७ :** जमिनीच्या वादातून घरात घुसून कुटुंबीयांना बेदम मारहाण केल्याप्रकरणी सात जणांविरुद्ध दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हिंगणीबेर्डी (ता. दौंड) ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. १५० व १५१ या जमिनीच्या वादातून २५ फेब्रुवारी २०२६ ला दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली.

माऊली बबन वाळके, बबन राऊ वाळके, सुदाम राऊ वाळके, परमेश्वर आप्पा वाळके, सिध्दी परमेश्वर वाळके, नंदाबाई बबन वाळके, मंदा परमेश्वर वाळके (सर्व रा. विठठल नगर, हिंगणीबेर्डी, ता. दौंड) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या सात जणांची नावे आहेत. याप्रकरणी बंकट दत्तू मचिंदर (वय-४०, व्यवसाय शेती, रा. हिंगणीबेर्डी, ता. दौंड) यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी व आरोपी यांच्यात गट नं. १५० व १५१ यामधील जमिनीच्या रस्त्याच्या वादावरून तहसीलदार कार्यालयात प्रकरण सुरू आहे. २५ फेब्रुवारीला दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास नायब तहसीलदार यांनी संबंधित जमिनीवर स्पॉट पंचनामा केला होता. निकाल विरोधात जाईल या भीतीने रागाच्या भरात आरोपींनी फिर्यादींच्या नातेवाईकांच्या घरात घुसून मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

यावेळी उत्तम मचिंदर यांची पत्नी मिना उत्तम मचिंदर यांनी आरडाओरड केल्याने फिर्यादी बंकट मचिंदर आणि त्यांचा चुलत भाऊ अमोल उत्तम मचिंदर हे मदतीसाठी धावत आले. मात्र आरोपींनी त्यांनाही शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच जिवे मारण्याच्या धमक्या दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. जखमींनी उपचार घेतल्यानंतर पोलिसांकडे तक्रार दिली.

# रशियाकडून तेल खरेदीला भारताला अमेरिकेची ३० दिवसांची सूट; पश्चिम आशियातील तणावामुळे निर्णय

**नवी दिल्ली, ता. ७ :** पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने भारताला रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी ३० दिवसांची तात्पुरती सूट दिली आहे. अमेरिकेचे वित्त सचिव स्कॉट बेसेंट यांनी एका मुलाखतीत ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की जागतिक तेल पुरवठ्यावर निर्माण झालेला दबाव कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

फॉक्स बिझनेसला दिलेल्या मुलाखतीत स्कॉट बेसेंट म्हणाले की, पश्चिम आशियातील अस्थिर परिस्थितीमुळे तेल वाहतुकीवर परिणाम झाला आहे. विशेषतः होमुज सामुद्रधुनीमार्गे होणाऱ्या समुद्री वाहतुकीत अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे जगभरातील तेल पुरवठ्यावर ताण निर्माण झाला आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन भारताला रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी मर्यादित कालावधीची सूट देण्यात आली आहे.

बेसेंट यांच्या मते, हा निर्णय तात्पुरता आहे आणि त्यामुळे रशियाला मोठा आर्थिक फायदा होणार नाही. ही सूट मुख्यतः समुद्रात अडकलेल्या तेलाच्या व्यवहारांशी संबंधित आहे. भारत हा अमेरिकेचा महत्त्वाचा भागीदार असल्याचे सांगत त्यांनी भारताने भविष्यात अमेरिकेकडूनही अधिक तेल खरेदी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

दरम्यान, पश्चिम आशियातील तणाव वाढण्यामागे इराणशी संबंधित परिस्थितीचा देखील मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर दबाव वाढला आहे. भारत आपल्या गरजेपैकी सुमारे ४० टक्के कच्चे तेल मध्य पूर्वेतील देशांकडून आयात करतो. यातील मोठा हिस्सा होर्मुज सामुद्रधुनीमार्गे येतो. त्यामुळे त्या मार्गावर अडथळे निर्माण झाल्यास भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर परिणाम होऊ शकतो. भारत सरकार मात्र ऊर्जा सुरक्षेबाबत सतर्क असल्याचे सांगितले जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, भारत दररोज दोन वेळा देशातील ऊर्जा परिस्थितीचा आढावा घेत आहे. सध्या देशाकडे पुरेसा तेलसाठा उपलब्ध असून त्याची सतत भर घातली जात आहे.




केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी यांनीही याबाबत प्रतिक्रिया देताना सांगितले की भारतात सध्या ऊर्जा टंचाईची कोणतीही समस्या नाही. सरकार नागरिकांना स्वस्त आणि स्थिर इंधन उपलब्ध करून देण्यावर भर देत आहे. गेल्या काही वर्षांत भारताने तेल आयातीसाठी अनेक देशांकडे पर्याय निर्माण केले आहेत. २०२२ साली भारताच्या एकूण तेल आयातीत रशियाचा वाटा फक्त ०.२ टक्के होता. मात्र त्यानंतर हा आकडा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सरकारी माहितीनुसार, फेब्रुवारी महिन्यात भारताने आपल्या गरजेपैकी सुमारे २० टक्के तेल रशियाकडून आयात केले. हे दररोज सुमारे १०.४ लाख बॅरल इतके होते.

अमेरिकेचे ऊर्जा सचिव क्रिस राइट यांनीही सांगितले की भारताला दिलेली ही ३० दिवसांची सूट जागतिक तेलाच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी देण्यात आली आहे. दक्षिण आशियाच्या समुद्री भागात टँकरमध्ये मोठ्या प्रमाणात रशियन तेल साठवलेले आहे. हे तेल बाजारात लवकर उपलब्ध झाल्यास जागतिक पुरवठ्यावरील ताण कमी होऊ शकतो. एकूणच, पश्चिम आशियातील तणाव आणि जागतिक ऊर्जा बाजारातील अनिश्चितता लक्षात घेता भारताला दिलेली ही सूट तात्पुरती असली तरी जागतिक तेल बाजारासाठी महत्त्वाची मानली जात आहे.

# आरटीई प्रवेशासाठी १ किलोमीटरची अट बेकायदेशीर? नागपूर खंडपीठाने महाराष्ट्र सरकारला बजावली नोटीस

**नागपूर, ता. ७ :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (RTE) प्रवेशासाठी घरापासून १ किलो मीटरच्या आत शाळा असणे बंधनकारक करणाऱ्या नव्या नियमाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर महाराष्ट्र सरकार आणि राज्य शालेय शिक्षण विभागाला नोटीस बजावली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील शंकर बाबुराव आत्राम यांनी ही याचिका दाखल केली आहे.




न्यायमूर्ती राज वाकोडे आणि न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या खंडपीठाने ५ मार्च रोजी दिलेल्या आदेशात नोंदवले की याचिकाकर्ते अनुसूचित जमातीचे सदस्य असून त्यांनी आपल्या मुलाच्या RTE च्या २५ टक्के कोट्यांतर्गत प्रवेशासाठी अर्ज करण्याचा प्रयत्न केला. मात्र घरापासून १ किलोमीटरच्या आत कोणतीही शाळा उपलब्ध नसल्याने ते अर्जच करू शकले नाहीत. या प्रकरणावर पुढील सुनावणी ९ मार्च रोजी होणार आहे. महाराष्ट्र सरकारने फेब्रुवारी २०२६ मध्ये नवीन नियम जाहीर केले. या नियमांनुसार RTE प्रवेश आता घरापासून फक्त १ किलोमीटरच्या आत असलेल्या शाळांपुरताच मर्यादित राहील. यापूर्वी विद्यार्थी किलोमीटर आणि त्यापलीकडील शाळांमध्येही प्रवेशासाठी अर्ज करू शकत होते.

याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सांगितले की २०२४ च्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार RTE कायद्याच्या कलम १२ (१)सी अंतर्गत २५ टक्के प्रवेशांसाठी अंतराची कोणतीही अट घालता येत नाही. त्यामुळे हा नवीन नियम कायद्याच्या विरोधात असल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्राच्या RTE नियमांना दुसऱ्यांदा न्यायालयात आव्हान दिले जात आहे. २०२४ मध्ये सरकारने एक नियम जाहीर केला होता की सरकारी किंवा अनुदानित शाळेच्या १ किलोमीटर परिसरातील खासगी शाळांना RTE प्रवेश देणे बंधनकारक नाही. मात्र हा नियम जनहिताच्या विरोधात असल्याचे सांगत मुंबई उच्च न्यायालयाने तो रद्द केला होता.

शाळांचे दोन हजार कोटी थकीत या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर आला आहे. RTE अंतर्गत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या फी परताव्यापोटी गेल्या काही वर्षांत खासगी शाळांचे सुमारे दोन हजार कोटी रुपये सरकारकडे थकीत आहेत. महाराष्ट्र सरकारने हे पैसे अद्याप शाळांना दिलेले नसल्याबद्दल खासगी शाळा संघटना वारंवार नाराजी व्यक्त करत आहेत.

# नांदेडच्या होमिओपॅथिक कॉलेजच्या विद्यार्थिनीची आत्महत्या; नातेवाईकांचा हॉस्टेल चालकावर आरोप

**नांदेड, ता. ७ :** नांदेड शहरातील हडको परिसरातील शामराव कदम होमिओपॅथिक कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना ६ मार्च रोजी दुपारी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून मृत विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांनी होस्टेल चालकावर गंभीर आरोप केले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आकांक्षा मुंजाजी गायकवाड (वय २५, रा. वाजेगाव) या युवतीने हडको भागातील शामराव कदम होमिओपॅथिक कॉलेजशी संबंधित वस्तीगृहात गळफास घेऊन आत्महत्या केली. ६ मार्च रोजी सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आला. दरम्यान, मयत विद्यार्थिनीच्या नातेवाईकांनी होस्टेल चालकाकडून होत असलेल्या मानसिक त्रासामुळेच आकांक्षाने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप केला. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित वस्तीगृहाचे चालक जीवन घोगरे पाटील असून ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी संबंधित असल्याचे सांगितले जाते. विद्यार्थिनीच्या मोबाईलमध्ये काही ऑडिओ संदेश असल्याचा दावा नातेवाईकांनी केला असून त्यामध्ये अपमानास्पद व अश्लील शब्दांचा वापर केल्याचे सांगण्यात येत आहे.या प्रकरणात संबंधित वस्तीगृह चालकाविरोधात गुन्हा दाखल करून सखोल चौकशी करावी, अशी मागणी नातेवाईक व स्थानिकांकडून करण्यात येत आहे.



दरम्यान, शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी नातेवाईकांनी मृतदेह स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे पोलिसांसमोर नवीन पेच निर्माण झाला आहे. या घटनेची सखोल चौकशी करून सत्य बाहेर यावे, अशी मागणी नागरिकांकडू व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## मिल्की पनीर खाण्यास खरोखर सुरक्षित आहे का, जाणून घ्या

सोशल मीडियावरील काही मुद्दे हे फार महत्त्वाचे असतात. केवळ याकडे एक मुद्दा न पाहता जागरुकपणे पाहिल्यास हेही विषय आपल्या कामाचे ठरु शकतात. नुकतेच एक्सवरील एका पोस्टमुळे मिल्की पनीर हे पुनश्च चर्चेत आले आहे. त्यामुळेच आता मिल्की पनीर रोज घेणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एक्सपायरी होण्यास काही दिवस शिल्लक असतानाही ब्रँडच्या दोन वेगवेगळ्या पॅकेटमध्ये फुगवटा दिसत आहे.

मिल्की मिस्ट हाय प्रोटीन पनीर एक्सपायरी डेट दोन आठवडे बाकी असतानाही फुगलेले होते. त्यामुळेच एक्सपायरी डेटला दहा दिवस बाकी असतानाही पनीरचे बाह्य आवरण कसे फुगले होते यावर आता चर्चा रंगू लागली आहे.

मिल्की मिस्ट पनीरचा असाच अनुभव इतर अनेक ग्राहकांना आल्यामुळे, हा मुद्दा आता सोशल मीडियावर चांगलाच चर्चिला जाऊ लागला आहे. मिल्की पनीर हे काहीजणांना रबरासारखे लागले त्यामुळे काहींनी हे वापरणे सोडून दिल्याचे प्रतिक्रियांदरम्यान उघड झाले. तसेच हे चक्क्यासारखे दिसत असल्यानेही काहींनी याकडे पाठ फिरवली आहे. एकूणच काय तर सध्याच्या घडीला मिल्की पनीर संदर्भातील अनेक पोस्ट आपल्याला सोशल मीडियावर दिसत आहेत.

# धर्मांतरविरोधी कायद्याच्या मसुद्याला मंजुरी; जबरदस्तीने धर्मांतर करणाऱ्याला ७ वर्षांची कैद

**मुंबई, ता. ७ :** राज्यात अनेक ठिकाणी बळजबरीने आणि चुकीची माहिती देऊन धर्मांतर झाल्याचे प्रकार उघड झालं होतं. तसेच धर्मांतरामुळे सांस्कृतिक ओळख बदलण्याचीही भीती व्यक्त केली जात होती. त्यामुळे धर्मांतर विरोधी कायद्यासाठी आग्रही भूमिका घेण्यात आली होती.



राज्य सरकारनेही धर्मांतर विरोधी कायद्यासाठी कटिबद्ध असल्याचं म्हणत महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. काही दिवसापूर्वी पुण्यातील भिगवण बाजारपेठेतून तरुणीचे अपहरण झाल्याच्या घटनेने खळबळ उडाली होती. याप्रकरणी हिंदुत्ववादी संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली होती. ज्याचे राज्यभरात पडसाद उमटल्याचे पाहायला मिळाले होते.

त्यानंतर राज्यात धर्मांतर विरोधी विधेयकाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. जबरदस्तीने फसवणूक किंवा आमिष दाखवून धर्मांतर करणाऱ्याला आता ७ वर्षांची कैद होणार आहे. तसेच ५ लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा देखील होणार आहे. धर्मांतरविरोधी कायद्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे.

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६ या नव्या कायद्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. मात्र यावरून नवा राजकीय वाद निर्माण होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. राज्य सरकारचं विधेयक आणि प्रस्तावित कायदा संविधानविरोधी असल्याचा आरोप विरोधकांनी केला. यानुसार महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६ नुसार, ६० दिवसांपूर्वी धर्म बदलणार असल्याची माहिती संबंधित व्यक्तीला प्रशासनाला द्यावी लागेल. त्यासाठी कायदेशीर प्रक्रिया पार करावी लागेल. संबंधित प्रशासन अस्थापनेकडे अर्ज करून माहिती द्यावी लागेल. धर्म बदलण्यासाठीची कारणं नमूद करून परवानगी घ्यावी लागेल.

धर्मांतरणासाठी २५ दिवसांच्या आत त्यासाठी राज्य सरकारकडे नोंद करावी लागेल. जर विहित नमुन्यात अर्ज नसेल, कायदेशीर प्रक्रिया नसेल. संबंधित व्यक्ती दबावाखाली असल्याचे अथवा आमिषाला बळी पडल्याचे दिसत असेल तर धर्मांतरणाला परवानगी नाकारण्यात येणार आहे.

दरम्यान, याचे आता कायद्यात रुपांतर करण्यासाठी या अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा प्रस्ताव विधानसभा आणि विधान परिषदेत मंजुरीसाठी मांडण्यात येईल. दोन्ही सभागृहाची मंजुरी मिळाल्यानंतर विधेयक मंजुरीसाठी राष्ट्रपतींकडे पाठवण्यात येईल. राष्ट्रपतींची मंजुरी मिळताच हा कायदा राज्यात लागू होईल. यापूर्वी देशातील उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तराखंड, गुजरात, हिमाचल प्रदेश, राजस्थान यासारख्या भाजप शासित राज्यात लव्ह जिहाद आणि धर्मांतर विरोधी कायदा अस्तित्वात आहे

## गॅस सिलेंडरमधून बेकायदेशीर रिफिलिंग; एकावर गुन्हा

**चिखली, ता. ७ :** घरगुती गॅस सिलेंडरमधून छोट्या सिलेंडरमध्ये बेकायदेशीररित्या गॅस भरताना एका व्यक्तीवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई शुक्रवारी (ता. ०६) रोजी रात्री पावणे आठ वाजताच्या सुमारास चिखलीतील नेवाळेवस्ती परिसरात करण्यात आली.

याबाबत पोलीस हवालदार प्रविण गंगाराम भोमाळे (वय-४३) यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार २० वर्षीय तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कोणताही परवाना नसताना घरगुती गॅस सिलेंडरमधून इतर छोट्या सिलेंडरमध्ये गॅस भरत होता. यामुळे स्फोटाचा धोका निर्माण होऊ शकत होता. पोलिसांनी कारवाई करत एक मोठा सिलेंडर, आठ छोटे सिलेंडर, रिफिलिंग साहित्य व वजनकाटा असा एकूण १६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चिखली पोलीस तपास करत आहेत



## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

### रुपराज काळभोर युवा मंचच्या वतीने आयोजन

**लोणी काळभोर, ता. ७ :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त (तिथीनुसार) सामाजिक बांधिलकी जपत रुपराज काळभोर युवा मंच यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत एकूण ६२ रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेची सेवा केली.

या शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या सदस्या, कोमल कांबळे, पंचायत समितीचे सदस्य अमोल टेकाळेयांच्या हस्ते करण्यात आले. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच व विद्यमान सदस्य नंदू काळभोर होते. या कार्यक्रमाचे आयोजन रुपराज काळभोर व मित्र परिवार यांच्या पुढाकाराने करण्यात आले. समाजोपयोगी उपक्रम म्हणून आयोजित या रक्तदान शिबिराचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

यावेळी विशाल गुजर, सुशील महाराज काळभोर, प्रतीक काळभोर, ऋषिकेश काळभोर, सुभाष तात्या काळभोर, मयूर कदम, शरीफ मामू खान, माऊली काळभोर, सतीश काळभोर, दत्तात्रेय काळभोर, मुकुल काळभोर, वंदना सचिन काळभोर, मनीषा नंदू काळभोर आदी मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमासाठी श्री गणेश मित्र मंडळ यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच अविनाश जोशी (अक्षय ब्लड केंद्र, हडपसर) व विपुल खंडागळे (युग हॉस्पिटल, लोणी स्टेशन) यांनी वैद्यकीय सहकार्य केले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित या रक्तदान शिबिरातून सामाजिक ऐक्य, सेवाभाव आणि मानवतेचा संदेश देण्यात आला.

## कर्नाटक सरकारची घोषणा; १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडियावर बंदी

**कर्नाटक, ता. ७ :** कर्नाटकामध्ये १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी विधानसभेत बंदी घालण्याची घोषणा केली आहे. १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर बंदी घालणारे कर्नाटक हे देशातील पहिले राज्य बनले आहे.





सोशल मीडिया हा छोट्या मुलांसाठी एक धोका बनला आहे. १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडियाचा धोका टाळण्यासाठी कर्नाटक सरकारने हा निर्णय घेतला आहे. गेल्या महिन्यात राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या कुलगुरूंशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी ऑस्ट्रेलियाचे उदाहरण देत सोशल मीडिया वापरावरील वय-आधारित निर्बंधांवर चर्चा केली. या काळात सरकारने सोशल मीडिया बंदीसाठी आंतरराष्ट्रीय मॉडेल्सचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला होता. सोशल मीडियावर तरुणांचा वाढता प्रभाव पाहता, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि सोशल मीडियाचा जबाबदार वापर सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकार काही उपाययोजना करण्याचा गांभीर्याने विचार करीत आहे. ही एक गंभीर समस्या असून फिनलँडनेसुद्धा यावर निर्णय घेतला आहे. युनायटेड किंगडमदेखील अशाच प्रकारचे पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे, असे कर्नाटकचे माहिती तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञान (आयटी अँड बीटी) मंत्री प्रियांक खरगे यांनी ३० जानेवारीला कर्नाटक विधानसभेत सांगितले होते. त्यावर विचार केल्यानंतर अखेर सरकारने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.

ऑस्ट्रेलिया, फ्रान्ससह काही देशांमध्ये १३ वर्षांखालील मुलांना सोशल मीडियावर अकाऊंट बनवण्याची परवानगी नाही, तर काही देशांमध्ये मुलांसाठी डेटा आणि स्क्रीन टाइमसंबंधी कायदे करण्यात आले आहेत.

## इराणने शरणागती पत्करल्याशिवाय करार होणार नाही : डोनाल्ड ट्रम्प

**नवी दिल्ली, ता. ७ :** इराण आणि इस्त्रायलमधील भीषण युद्धामुळे जगभरात चिंतेचे वातावरण असतानाच, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या एका सोशल मीडिया पोस्टने युद्धविरामाचे संकेत दिले आहेत. ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर इराणने विनाअट शरणागती पत्करल्याशिवाय करार होणार नाही, अशी स्पष्ट भूमिका मांडली आहे. या विधानामुळे १२ मार्च २०२६ पर्यंत युद्ध थांबण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये पुढे म्हटले आहे की, इराणने शरणागती पत्करल्यानंतर आणि एका नवीन योग्य नेत्याची निवड झाल्यानंतर, अमेरिका इराणची अर्थव्यवस्था पूर्वीपेक्षा अधिक मजबूत करण्यासाठी काम करेल.

यामागे जुना पॅटर्न आहे असे म्हटले जात आहे. १७ जून २०२५ रोजी जेव्हा इराण-इस्त्रायलमध्ये १२ दिवसांचे युद्ध सुरू होते, तेव्हाही ट्रम्प यांनी विनाअट शरणागती अशीच मागणी केली होती. त्या पोस्टच्या बरोबर दिवसांनंतर, म्हणजेच २३ जून रोजी युद्धबंदीची घोषणा झाली होती. जर हाच ६ दिवसांचा पॅटर्न पुन्हा लागू झाला, तर ६ मार्च रोजी केलेल्या या नव्या पोस्टनंतर १२ मार्च २०२६ पर्यंत युद्धविराम घोषित होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

## पुणे शहरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यू

**पुणे, ता. ७ :** खराडी बाह्यवळण मार्गावर भरधाव मोटारीच्या धडकेत पादचारी महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी मोटार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. शकुंतला निकाळजे (वय-५५) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी मोटार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस हवालदार राहुल गिरमे यांनी खराडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शकुंतला निकाळजे या खराडी बाह्यवळण मार्ग परिसरातून ५ फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास निघाल्या होत्या. त्या वेळी मणिपाल हॉस्पिटलसमोर भरधाव मोटारीने त्यांना धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या निकाळजे यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. सहायक पोलीस निरीक्षक गोडसे तपास करत आहेत.

औंध परिसरात भरधाव वाहनाच्या धडक्त पादचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली. विजयसिंग गोकुळसिंग राजपूत (वय ५४, रा. मेडीपॉईंट हॉस्पिटलजवळ, औंध) असे मृत्युमुखी पडलेल्या पादचाऱ्याचे नाव आहे. या प्रकरणी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत भगवानसिंग मोहनसिंग राजपूत (वय-५८) यांनी चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भगवानसिंग यांचे मेहुणे विजयसिंग राजपूत हे ५ फेब्रुवारी रोजी रात्री आठच्या सुमारास औंधमधील गायकवाड पेट्रोल पंप परिसारतून निघाले होते. त्या वेळी भरधाव वाहनाने त्यांना धडक दिली. अपघातानंतर घटनास्थळी न थांबत वाहन चालक पसार झाला. सहयाक पोलीस निरीक्षक नरेंद्र पाटील तपास करत आहेत.

## आंध्रात दोनपेक्षा जास्त मुले जन्माला घातल्यास २५ हजार रुपये मिळणार

**आंध्र प्रदेश, ता. ७ :** दोन किंवा त्यापेक्षा जास्त मुले जन्माला घालणाऱ्या दांपत्याला आंध्र प्रदेश सरकार २५ हजार रुपये प्रोत्साहन रक्कम देणार आहे. ही घोषणा आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केली. राज्यात कमी झालेला जन्मदर पाहता हा निर्णय घेण्यात आला आहे. चंद्राबाबू नायडू यांनी विधानसभेत राज्याचे नवीन लोकसंख्या व्यवस्थापन धोरण मांडले. राज्याचा प्रजनन दर १.५ पर्यंत खाली घसरल्याने नायडू यांनी चिंता व्यक्त केली आहे. ज्या कुटुंबात दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या मुलाचा जन्म होईल, त्यांना प्रसवसमयी २५ हजार रुपयांचे रोख प्रोत्साहन देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.



राज्यात जन्मदर कमी झाल्यामुळे भविष्यात तरुणांची संख्या घटून वृद्धांची लोकसंख्या वाढण्याची भीतीही नायडू यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, याचा थेट परिणाम अर्थव्यवस्थेवर आणि मनुष्यबळाच्या उपलब्धतेवर होऊ शकतो. दक्षिणेकडील राज्यांची लोकसंख्या अशीच कमी होत राहिली तर भविष्यात लोकसभेतील प्रतिनिधित्वही कमी होऊ शकते, असा इशारा त्यांनी दिला. आकडेवारीनुसार, राज्यातील ५८ टक्के कुटुंबांमध्ये सध्या केवळ एकच मूल आहे. मुख्यमंत्री नायडू म्हणाले की, राज्याचा विकास टिकवून ठेवण्यासाठी तरुणांची गरज आहे. जर जन्मदर वाढला नाही, तर शेती आणि उद्योगांसाठी कामगार मिळणार नाहीत.

## घरगुती गॅसच्या दरामध्ये वाढ, व्यावसायिक सिलिंडरही ११५ रुपयांनी महागला

**नवी दिल्ली, ता. ७ :** मध्य पूर्वेत सुरू असलेल्या भीषण युद्धाची झळ सर्वसामान्य नागरिकांना बसायला सुरुवात झाली आहे. इराण-इस्त्रायल-अमेरिका युद्धामुळे जागतिक स्तरावर ऊर्जा संकट गडद होत असताना हिंदुस्थानात घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरामध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे. घरगुती वापराचा १४.२ किलो वजनाचा गॅस सिलिंडर ६० रुपयांनी, तर व्यावसायिक वापराचा १९ किलो वजनाचा गॅस सिलिंडर ११५ रुपयांनी महाग झाला आहे. शनिवार ७ मार्च २०२६ पासून ही दरवाढ लागू करण्यात आली आहे. घरगुती गॅस सिलिंडरची किंमत वाढल्याने गृहिणींचे बजेट कोलमडणार आहे.



दरम्यान, हॉटेल, रेस्टॉरंट आणि छोट्या व्यावसायांसाठी वापरल्या जाणाऱ्या १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरच्या दरात ११५ रुपयांची वाढ झाली आहे. मुंबईत व्यावसायिक वापराचा गॅस सिलिंडर १८३५ रुपयांवर, तर दिल्लीत १८८३ रुपयांवर पोहोचला आहे. या दरवाढीमुळे हॉटेलमधील जेवण आणि बाहेरील खाद्यपदार्थ महाग होण्याची चिन्हे आहेत. याचा फटकाही सर्वसामान्यांच्या खिशाला बसणार आहे.

एकीकडे दरवाढ झाली असली तरी देशात इंधनाचा तुटवडा नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी एक्सवर पोस्ट करत याबाबत माहिती दिली. देशात ऊर्जेचा कोणताही तुटवडा नाही. नागरिकांना परवडणारे आणि शाश्वत इंधन उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिकता आहे, असेही पुरी यांनी स्पष्ट केले. तसेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशनने देखील इंधन टंचाईच्या अफवा फेटाळून लावल्या आहेत. देशात पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा पुरेसा साठा असून पुरवठा साखळी सुरळीत सुरू असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

## गुरमीत राम रहीमची जन्मठेपेची शिक्षा रद्द; पत्रकार हत्या प्रकरणात निर्दोष मुक्तता

**पंजाब, ता. ७ :** पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने शनिवारी डेरा सच्चा सौदाचे प्रमुख गुरमीत राम रहीम सिंग याला मध्ये पत्रकार रामचंद्र छत्रपती हत्येप्रकरणी निर्दोष मुक्त केले. विशेष सीबीआय न्यायालयाने त्यांना दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. सात वर्षांहून अधिक काळ शिक्षा भोगल्यानंतर त्याला निर्दोष सोडण्यात आले. पीटीआयने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.



गुरमीत राम रहीम सिंग यांचे सिंग आणि इतर तीन जण कुलदीप सिंग, निर्मल सिंग आणि कृष्ण लाल यांना २०१९ मध्ये सिरसा येथील पत्रकार रामचंद्र छत्रपती यांच्या हत्येप्रकरणी विशेष सीबीआय न्यायालयाने दोषी ठरवले होते आणि त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. डेरा प्रमुखाने या निकालाला पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

पत्रकार रामचंद्र छत्रपती पूरा सच हे वृत्तपत्र चालवत होते, त्यांची ऑक्टोबर २००२मध्ये हरियाणातील सिरसा येथील त्यांच्या घराबाहेर गोळ्या घालून हत्या करण्यात आली. त्यांच्या प्रकाशनात डेरा सच्चा सौदा मुख्यालयात महिला अनुयायांचे लैंगिक शोषण होत असल्याचा आरोप करणारे एक निनावी पत्र प्रकाशित झाल्यानंतर हा हल्ला झाला. घडामोडींना दुजोरा देताना, गुरमीत राम रहीम सिंग यांचे वकील जितेंद्र खुराणा यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाने खून खटल्यातील शिक्षा रद्द केली आहे. पत्रकार रामचंद्र छत्रपती यांच्या खून प्रकरणात न्यायालयाने त्यांना निर्दोष मुक्त केले आहे, असे खुराणा म्हणाले.

खून प्रकरणातून निर्दोष मुक्तता झाल्यानंतरही, गुरमीत राम रहीम सिंगला २०१७ मध्ये त्याच्या दोन शिष्यांवर बलात्कार केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले होते आणि २० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा भोगावी लागली होती. त्या शिक्षेनंतर, त्याला हरियाणाच्या रोहतकमधील सुनारिया तुरुंगात ठेवण्यात आले होते.

२०१७ मध्ये दोषी ठरवण्यात आल्यापासून त्याला १४ वेळा पॅरोलवर सोडण्यात आले होते. सिरसा येथे मुख्यालय असलेल्या डेरा सच्चा सौदाचे हरियाणा, पंजाब, राजस्थान आणि इतर राज्यांमध्ये मोठ्या संख्येने अनुयायी आहेत. हरियाणामध्ये, सिरसा, फतेहाबाद, कुरुक्षेत्र, कैथल आणि हिसारसह अनेक जिल्ह्यांमध्ये डेराचे अनुयायी मोठ्या संख्येने आहेत.